लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे,
नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज सांगली
आर्टस — कॉमर्स
''बी'' पुनर्मुल्यांकित महाविद्यालय
राजनेमी परिसर, उत्तर शिवाजीनगर, सांगली —४१६४१६
फोन — (०२३३) २३७५०७५ फॅक्स — (०२३३) २३७५०७३ पोस्ट बॉक्स नं.३८ (महाराष्ट्र)

Website-www.ndpnesanglicollege.com E-mail.Id-ndpnesangli@rediffmail. Com
कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक कमांक — J.22.08.013

जा.क्र.एनडीपीएनसी./ दिनांक:— / /

# दाखला

दाखला देणेत येतो की, या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सन २०१५ - १६ या शैक्षणिक वर्षात नियमित कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालय परिसरात खालील उपक्रम राबविले आहेत.

१) दि.०६.०७.२०१५ - राष्ट्रीय सेवा योजना - उद्घाटन कार्यक्रम
२) दि.०८.०७.२०१५ - विद्यार्थी प्रबोधन - प्रा.शिवप्रसाद शेटे
३) दि.११.०७.२०१५ - जागतिक लोकसंख्या दिन - व्याख्याते - प्रा.बी.बी.पाटील
४) दि.१९.०७.२०१५ - विद्यार्थी प्रबोधन - प्रा.शिवप्रसाद शेटे
५) दि.२०.०७.२०१५ - विद्यार्थी कृषी संस्कार कार्यक्रम व सक्रीय सहभाग - व्दारा हरीतक्रांती प्रतिष्ठान, वानलेसवाडी
६) दि.२२.०२.२०१५ - विद्यार्थी प्रबोधन - प्रा.शिवप्रसाद शेटे
७) दि.२७.०७.२०१५ - भारतातील साक्षरता कार्यक्रम - व्याख्यान -प्रा. संदिप रावळ
८) दि.०१.०८.२०१५ - सार्वजनिक स्वच्छता - व्याख्यान - डॉ.ज्ञानचंद्र पाटील
९) दि.०२.०८.२०१५ - विद्यार्थी प्रबोधन - प्रा.शिवप्रसाद शेटे
१०) दि.१४.०८.२०१५ - महाविद्यालय परिसर स्वच्छता
११) दि.२९.०८.२०१५ - रक्षाबंधन कार्यक्रम
१२) दि.३१.०८.२०१५ - मॅनेजमेंट गेम्स - प्रा.शिवप्रसाद शेटे
१३) दि.०४.०९.२०१५ - रक्तदान शिबीर व हेल्थ चेकअप कॅंप
१४) दि.१५.०९.२०१५ - आंतरराष्ट्रीय शांतता दिवस - व्याख्यान - प्रा.डॉ.राजू सावंत
१५) दि.२१.०९.२०१५ - घरगुती गणपती विसर्जन निर्माल्य गोळा करणे
१६) दि.२७.०९.२०१५ - सार्वजनिक गणपती विसर्जन निर्माल्य गोळा करणे
१७) दि.२९.०९.२०१५ - एन.एस.एस. प्रचार व प्रसार - व्याख्यान - प्रा.डॉ.अमर पांडे
१८) दि.०२.१०.२०१५ - महात्मा गांधी जयंती निमित्त महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता मोहिम व श्रमदान
१९) दि.१६.१०.२०१५ - जागतिक अन्न दिवस - व्याख्यान - प्रा.संदिप रावळ
२०) दि.०१.१२.२०१५ - जागतिक एडस दिवस - व्याख्यान - प्रा.डॉ.बी.एस.पाटील
२१) दि.०२.१२.२०१५ - बचतीचे महत्व - व्याख्यान - प्रा.डॉ.बी.एस.पाटील
२२) दि.१०.१२.२०१५ - Human Rights - व्याख्यान व चर्चासत्र - प्रा.डॉ.आर.व्ही.खोत
२३) दि.१२.०१.२०१६ - राष्ट्रीय युवा दिन - व्याख्यान - प्रा.पंढरीनाथ पाटील
२४) दि.२५.०१.२०१६ - राष्ट्रीय मतदार जागृती दिन रॅलीमध्ये सहभाग
२५) दि.२५.०१.२०१६ - प्रजासत्ताक दिन पूर्वसंध्येला महाविद्यालयीन परिसर स्वच्छता मोहिम
२६) दि.२६.०१.२०१६ - प्रजासत्ताक दिन
२७) दि.२७.०१.२०१६ ते ३०.०१.२०१६ - शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण - गोकुळनगर परिसर
२८) दि.३०.०१.२०१६ - हुतात्मादिन निमित्त व्याख्यान - प्रा.बाळासाहेब कोट्टलगी
२९) दि.१०.०२.२०१६ ते १२.०२.२०१६ - विशेष श्रमसंस्कार शिबिर निमित्त प्रबोधनपर कार्यक्रम - प्रा.शिवप्रसाद शेटे
३०) दि.१३.०२.२०१६ - विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी विद्यार्थी रवाना
३१) दि.१४.०२.२०१६ ते २०.०२.२०१६ - ग्राम आरवडे, ता.तासगांव येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर
३२) दि.०२.०३.२०१६ - भारतीय स्वातंत्र्य लढा - प्रा.गौतम ढाले

TRUE COPY
PRINCIPAL
Nemgonda Dadu Patil Night
College of Arts & Commerce, Sangli

लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे,
नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज सांगली
आर्टस — कॉमर्स
''बी'' पुनर्मुल्यांकित महाविद्यालय
राजनेमी परिसर, उत्तर शिवाजीनगर, सांगली —४१६४१६
फोन — (०२३३) २३७५०७५ फॅक्स — (०२३३) २३७५०७३ पोस्ट बॉक्स नं.३८ (महाराष्ट्र)

Website-www.ndpncsanglicollege.com E-mail.Id-ndpncsangli@rediffmail. Com
कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक — J.22.08.013

जा.क्र.एनडीपीएनसी./ दिनांकः— / /

३३)दि.06/03/2016 - भारतीय स्त्रीयांचे सवलीकरण - प्रा.डॉ.सौ.स्नेहा वालवडकर
३४)दि.११.०३.२०१६ - डॉ.वावासाहेव आंवेडकरांचा स्त्री विषयक दृष्टीकोन - व्याख्यान - प्रा.सुनिता वोर्डे खडसे
३५)दि.१२.०३.२०१६ - डॉ.वावासाहेव आंवेडकरांच्या जीवनावरील पोस्टर प्रदर्शन
३६)दि.२२.०३.२०१६ - दुष्काळी भागातील जल परिस्थिती एक पाहणी

**Programme Officer**
Nemgonda Dada Patil Night College
Of Arts & Commerce, Sangli

**PRINCIPAL**
Nemgonda Dada Patil Night,
College of Arts & Commerce, Sangli

TRUE COPY

**PRINCIPAL**
Nemgonda Dada Patil Night,
College of Arts & Commerce,Sangli

ल.ए.सोसायटीचे

# नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, सांगली

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम अहवाल २०१५—१६

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडून आमच्या महाविद्यालयास १०० स्वयंसेवकांचे एक युनिट मंजूर करणेत आले आहे.

**राष्ट्रीय सेवा स्वयंसेवक नोंदणी :—** शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे यासाठी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर नोटीस लावणेत आली होती. तसेच ही नोटीस सिनियर महाविद्यालयाच्या वर्गात फिरवली होती. या नोटीस मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची थोडक्यात माहिती दिली होती. त्या अनुषंगाने रितसर प्रवेश अर्ज भरून घेऊन प्रथम आणि व्दितीय वर्षासाठी १०० विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. यामध्ये विद्यापीठाच्या नियमानुसार अनुसूचित जाती व अनुसूचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून येण्यात आले आहे.

**उदघाटन :—** राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महाविद्यालयातील विविध मंडळे असा संयुक्त उद्घाटन संमारभ न्यास नोंदणी आयुक्त मा.श्री.अजित जोगी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा सर्वगुण संपन्न सक्षम नागरीक बनतो तसेच सामाजिक बाधिलकितून तो सामजसेवक बनतो असे प्रतीपादन यावेळी त्यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमर पांडे विविध मंडळाचे निमंत्रक प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

**प्रबोधन शिबीर :—** राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांचे तीन दिवस प्रबोधन शिबीर घेण्यात आले. या शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत नियमित कार्यक्रमातंर्गत आणि विशेष शिबीराव्दारे कोणकोणते उपक्रम राबवले जातात या विषयी स्वंयसेवकांना सविस्तर माहिती देणेत आली. त्याच प्रमाणे या विभागाची सुरवात कशी झाली. एन.एस.एसमध्ये सहभागी झाल्यानंतर कोणकोणते फायदे होतात. या विषयी माहिती देणेत आली. राष्ट्रीय सेवा योजनेत यशस्वीपणे २४० तास पूर्ण करणा—या आणि विशेष शिबीरामध्ये सहभागी होणा—या विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून अंतीम परीक्षेत १० गुंण अधीक दिले जाणार असल्याची माहितीही विद्यार्थ्यांना देणेत आली. याच बरोबर वर्षभरामध्ये राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत कोणकोणते उपक्रम राबवले जाणार आहेत. याचे नियोजन विद्यार्थ्यांना सांगितले.

**श्रमदान, साफसफाई, स्वच्छता :—** महाविद्यालयाने एन.एस.एस.चे विविध उपक्रम राबवण्यासाठी आरवडे ता.-तासगांव जि.सांगली. हे गाव दत्तक खेडे म्हणून निवडले आहे. दत्तक खेडे आरवडे या बरोबरच महाविद्यालय परीसर स्वच्छता व साफसफाई झाडाना आळी करणे व पाणी देणे, गाजर गवत निर्मुलन अशी श्रमदानाची कामे केली आहेत.

TRUE COPY
PRINCIPAL
Nemgonda Dada Patil Night,
College of Arts & Commerce

रक्तदान शिबीर, साक्षरता, पर्यावरण, एड्स जनजागृती, लेक वाचवा, इत्यादी विषयावर पोस्टर प्रेझेन्टेशन, हेल्थ चेकअप कॅंप, विविध विषयांवरील व्याख्याने उदा. लोकसंख्या दिन, भारतातील साक्षरता, स्त्री सबलीकरण, जागतिक अन्न दिवस, जागतिक एड्स दिन, मानवी हक्क, हुतात्मा दिन, जागतीक महिला दिन इ. दिन साजरे करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्त्री विषयक दृष्टीकोन यावर विशेष व्याख्यान पार पडले. कृष्णाघाट साफसफाई, गणपती विसर्जन निर्माल्य गोळा करणे हा कार्यक्रम घेण्यात आला.

**इतर कार्यक्रम :—** व्याख्याने श्रमदानाच्या कामाबरोबरच वर्ष भरामध्ये एन.एस.एस. तर्फे इतरही कार्यक्रम राबवन्यात आले आहेत. पर्यावरण जनजागृत मोहिम, प्रचार फेरी, मतदार जागृती प्रचार फेरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील पोस्टर प्रेझेंटेशन, मॅनेजमेंट गेम्स, गोकुळ नगर सारख्या सांगलीमधील अत्यंत संवेदनशील प्रभागामध्ये शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण इ. वैशिष्टयपूर्ण कार्यक्रम पार पाडले. वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणण्यासाठी तसेच त्यांच्यातील नेतृत्व गुणांचा विकास करण्यासाठी विविध व्याख्याने विविध चर्चासत्रे यांचे आयोजन करण्यात आले होते.

**विशेष श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांचा सहभाग :—** दिनांक १४/०२/२०१६ ते २०/०२/२०१६ या कालावधी मध्ये मु.पो.- आरवडे, ता. तासगांव, जि. सांगली या ठिकाणी संपन्न झालेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी अभूतपूर्व उत्साहाने सहभागी झाले होते. या कार्यक्रमांतर्गत "स्वच्छ भारत - स्वस्थ भारत" या शिर्षकांतर्गत काम करताना विद्यार्थ्यांनी आरवडे गावामध्ये वगिचा स्वच्छता मोहिम, ग्रामस्वच्छता अभियान, वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन, झाडांना आळी करणे, मंदीर स्वच्छता, श्री.राधागेपाल मंदीरातील पाण्याची टाकी सफाई इ. कामामध्ये उस्फुर्त सहभाग घेतला. गावकऱ्यांचे प्रवोधन करणे, शिवजयंती उत्सवात सहभागी होणे, प्रभातफेरी तसेच गावामधील जलव्यवस्थेची पाहणी करणे इ. कार्यक्रम पार पाडले.

**आभार :—** वर्षभरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे उपक्रम व्यवस्थीतपणे राबवण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमर पांडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याचबरोबर महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग,कमिटी सदस्य, प्रशासकीय सेवक आरवडे ग्रामपंचायतीचे मा. सरपंच, मा.उपसरपंच, मा.ग्रामसेवक व विद्यार्थी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्याच प्रमाणे शिवाजी विद्यापीठातील एन.एस.एस. विभागातील सर्व पदाधिकारी व कर्मचारी वर्ग यांचा सक्रीय सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांचे हार्दिक आभार.

TRUE COPY
PRINCIPAL

श्री.शिवप्रसाद शेटे
प्रोग्रॅम ऑफीसर

डॉ. अमर पांडे
प्राचार्य

# नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, सांगली

राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबिर अहवाल

## १४ फेब्रुवारी २०१६ ते २० फेब्रुवारी २०१६

आमच्या महाविद्यालयाचा विशेष श्रमसंस्कार शिबीर दि.१४ फेब्रुवारी २०१६ ते २० फेब्रुवारी २०१६ या कालावधीमध्ये मु.पो.आरवडे, ता.तासगांव, जि.सांगली या ठिकाणी उत्साहात पार पाडले. सदर शिबीराप्रसंगी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी अनेक कार्यक्रमामधून भाग घेतला.

दि.१४/०२/२०१६ रोजी महाविद्यालयामधून ५० स्वयंसेवक शिबीर स्थळी रवाना झाले. शिबीरार्थींची राहण्याची व्यवस्था आरवडे गावामधील श्री.राधागोपाल मंदीरामध्ये करण्यात आली होती. पहिल्याच दिवशी शिबीराचा उद्घाटनाचा कार्यक्रम पार पाडला. या कार्यक्रम प्रसंगी उद्घाटक म्हणून गावच्या सरपंच सौ.छायाताई म्हस्के, उपसरपंच श्री.प्रकाश चव्हाण ग्रामसेवक श्री.विजय म्हस्कर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमर पांडे यांनी भूषविले. सदर कार्यक्रमप्रसंगी श्री.राधा गोपाल मंदिराचे अध्यक्ष श्रीमान अभिराम ठाकुर हे विशेष अथिती म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रा.डॉ.संदीप रावळ यांनी आभार मानले.

दि.१५/०२/२०१६ सोमवारी शिबीरार्थीनी सकाळी ५.३० ते ६.३० व्यायाम व प्राणायाम करुन गावामध्ये प्रभात भ्रमण केले. त्यानंतर ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत श्री.राधागोपाल मंदीरामध्ये बगीचा स्वच्छता मोहिम पार पाडली. संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये शिबीरार्थीनी सहभाग घेतला.

**दि.१६/०२/२०१६ मंगळवार**

सकाळच्या नियमित प्रात:कालीन व्यायाम व प्रार्थना नंतर शिबीरार्थीनी आरवडे ग्राममधील राजासाब परिबाबा गार्डनच्या साफ सफाईमध्ये सहभाग घेतला. संध्याकाळच्या कार्यक्रमामध्ये प्रा.शिवप्रसाद शेटे यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. विद्यार्थ्यांनी सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला.

**१७/०२/२०१६ बुधवार**

सकाळच्या नियमित कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी परिबाबा गार्डनमधील झाडांना आळी करण्यात सहभाग घेतला. दुपारच्या सत्रामध्ये राजेंद्र पोळ यांनी शिबीरार्थींना "पंचमहाभूते" या विषयावर मार्गदर्शन केले. संध्याकाळी शिबीरार्थीनी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला.

**१८/०२/२०१६ गुरुवार**

सकाळच्या नियमित कार्यक्रमानंतर शिबीरार्थीनी आरवडे गावामधील ग्रंथालय परिसर भेट, ग्रामपंचायत भेट गावकऱ्यांशी संवाद साधला. दुपारच्या सत्रामध्ये श्रीमान अभिराम ठाकुर यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज

साधले. संध्याकाळी शिबीरार्थीनी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला.

**१९/०२/२०१६ शुक्रवार**

सकाळच्या नियमित कार्यक्रमानंतर शिबीरार्थीनी श्री.राधागोपाल मंदीराची सफाई मंदीराच्या गोशाळेमध्ये सफाई सेवा, मंदीराच्या टाकीची सफाई इत्यादी कामामध्ये सहभाग घेतला. दुपारच्या सत्रामध्ये श्री. ज्ञानेश्वर धनवडे यांनी "ग्रामीणउदयोगांसाठी भांडवल उभारणीसाठी बँकांचे सहाय्य या विषयावर मार्गदर्शन केले. संध्याकाळी शिबीरार्थीनी आरवडे ग्रामामध्ये शिवजयंती उत्सवामध्ये सहभाग घेतला.

**२०/०२/२०१६ शनिवार**

सकाळच्या सत्रामध्ये शिबीरार्थीनी श्री राधा गोपाल मंदीराची सफाई पुर्ण केली. संध्याकाळी शिबीराचा समारोप महाविद्यालयाचे प्रा.डॉ.अमर पांडे तसेच गावच्या सरपंच सौ.छायाताई म्हस्के यांच्या उपस्थितीतीने पार पडला.

**कार्यक्रम अधिकारी** **प्राचार्य**